वाचले- १) निविदा नो.क्र. १/७२/२०१४-१५ अ.क्र.२१

२) मे.ए. आर. भोंडवे यांचे दि. ९/६/२०१५ चा अर्ज

3) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.२२ /०७/२०१५ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रिय कार्यालय चिंचवड- ३३
क्र.स्था/लेखा/०९/कावि/२७८/ २०१५
दि. ३/८/२०१५

विषय – **निविदा भरणेस तीन वर्षाकरीता प्रतिबंध करणेबाबत.**
(मे.ए.आर.भोंडवे नि.नो.क्र.१/७२/२०१४-१५ अ.क्र.२१)

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील निविदा वाचले क्र.१ अन्वये ई-टेंडरिंग व्दारे प्रसिध्द करण्यात आले असता प्राप्त निविदामधील लघुत्तम ठेकेदार मे. ए.आर.भोंडवे यांचा सर्वात कमी दर असल्यामुळे त्यांची निविदा स्विकृत करणेत आली होती. तथापी मे.ए.आर.भोंडवे यांनी वाचले क्र. २चे अर्जान्वये बांधकाम व्यवसाय क्षेत्रामध्ये काम करण्यास सुरुवात केली असल्यामुळे सदरचे काम करण्यास तयार नसलेबाबत कळविले आहे. त्यामुळे निविदा अटी शर्तीचा भंग केला आहे. सदरची बाब योग्य नसुन महापालिकेचे आर्थिक नुकसान करणारी व मनपाचे विकास कामात अडथळा आणणारी आहे. त्यामुळे असे ठेकेदार मनपाचे निविदा प्रक्रियेत समाविष्ठ होवु नयेत यासाठी त्यांना निविदा प्रक्रियेत भाग घेणेस प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त बाबी विचारात घेता मी आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ या आदेशान्वये विषयांकित नो.क्र.१/७२/२०१४-१५ मधील काम क्र.२१ हे रद्द करुन याकामापोटी मे.ए.आर.भोंडवे यांनी भरलेली बयाणा EMDT24061456732दिं24/6/2014 रक्कम र.रु. ९,३३०/- जप्त करुन मनपा कोषागरात जमा करण्यास व मनपा कडील कोणतेही निविदा कामे पुढील तीन वर्षासाठी मे.ए.आर.भोंडवे यांना देणेत येऊ नये याबाबत या आदेशान्वये मान्यता देत आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८.

(स्थळप्रतीवर मा आयुक्तसो यांची स्वाक्षरी असे)

प्रती – मे.ए.आर.भोंडवे, भोंडवे वस्ती रावेत

प्रत- १.लेखा विभाग मुख्य कार्यालय,

२.सर्व विभागप्रमुख

२/-माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकामी सादर

सही/-
क्षेत्रिय अधिकारी
ब क्षेत्रिय कार्यालय चिंचवड-३३.